जाहिरात क्र.-१/२०२०

# महाराष्ट्र शासन

## सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग

## विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण) नागपूर विभाग नागपूर

**प्रशासकीय ईमारत क्र.-२, आठवा माळा, वींग-बी, जिल्हा परिषद समोर, सिव्हील लाईन, नागपूर**

दुरध्वनी क्रमांक- ०७१२-२५२८२३३ Email-djradt_ngp@rediffmail.com

## अनुसूचीत जमाती (ST) विशेष भरती मोहिम

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दि. २१/१२/२०१९ अन्वये सर्व प्रशासकीय विभागांनी खुद व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिकारी व कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग केल्यानंतर रिक्त होणारी अनुसूचीत जमातीच्या प्रवर्गाची पदे अनुसूचीत जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांमधून सेवाप्रवेश नियमानुसार विहीत कार्यपद्धतीचा अवलंब करून भरण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखून भरण्याची कार्यवाही करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्या अनुषंगाने शासन निर्देशानुसार विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण) नागपूर विभाग नागपूर यांचे अधिपत्याखालील विभागीय आस्थापनेवरील अनुसूचीत जमातीसाठी राखीव असलेली वर्ग-३ (गट-क) संवर्गातील सरळसेवेची खालील रिक्त पदे विशेष भरती मोहिम-२०२० अंतर्गत भरण्यासाठी पात्रता धारण करीत असलेल्या व अनुसूचीत जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांकडून **गुरुवार दिनांक ०६/०२/२०२०, सायंकाळी ५.४५ वा. पर्यंत कार्यालयीन वेळेत समक्ष अथवा पोस्टाने अर्ज मागविण्यात येत आहेत.**

**✦पदांचा तपशिल खालील प्रमाणे**

| पदांचे नाव | प्रवर्ग | पदसंख्या | समांतर आरक्षण | | | | | | समांतर आरक्षण व्यतिरिक्त (सर्वसाधारण) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सैनिक | अंशकालीन | प्रकल्पग्रस्त | खेळाडू | भूकंपग्रस्त | |
| उपलेखापरीक्षक | अनु. जमाती | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| कनिष्ठ लिपीक | अनु. जमाती | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ |

**✦टिप**-१) आंतरविभागीय/आंतर जिल्हा, अतिरिक्त संवर्ग कक्ष, इतर विभागातील पदांचा आढावा इत्यादी कारणास्तव जाहिरातीत नमूद पदांच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे. तसेच परीक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे या बाबतीत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण) नागपूर विभाग नागपूर यांच्या निर्णय अंतिम असेल. उमेदवारांची कोणतीही हरकत वा तक्रार यांचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी अर्ज भरतांना नोंद घ्यावी.

२) शासनाने भरतीबाबत/नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय परिपत्रक, आदेश इत्यादी भरती प्रक्रियेला लागू राहतील.

**✦उपलेखापरीक्षक संवर्ग**:- ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनस्तर एस-८ (रु. २५५००-८११००) अधिक देय भत्ते.

**पात्रता:-शैक्षणिक अर्हता**:- संविधानिक मान्यताप्राप्त विद्यापीठाची **वाणिज्य** शाखेतील ॲडव्हान्स अकौंटन्सी ॲंड ऑडिटिंग या विषयासह बी.कॉम. पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. (टिप- मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची अकौंटन्सी किंवा टॅक्सेशन मॅनेजमेंट अकौंटिंग ॲन्ड ऑडिटिंग व कॉस्ट अकौंटिंग किंवा फायनान्शिअल अकौंटन्सी व ऑडीटिंग या विषयासह वाणिज्य शाखेची बी.कॉम पदवी ही समतुल्य अर्हता म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.)

**✦कनिष्ठ लिपिक-टंकलेखन संवर्ग**:- ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनस्तर एस-६ (रु. १९९००-६३२००) अधिक देय भत्ते.

**पात्रता:-शैक्षणिक अर्हता**:- १. संविधानिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेची **पदवी** किंवा शासनाने त्यांच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता.

२. टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (इंग्रजी टंकलेखन ४० शब्द प्रति मिनिट किंवा मराठी टंकलेखन ३० शब्द प्रति मिनिट) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३. संगणक अर्हता- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रं/प्रशासन/२०००/प्र.क्र.४५/२००१/३२, दि. २०/०७/२००२ व अनुषंगिक शासन निर्णयान्वये कनिष्ठ लिपीक-टंकलेखक पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संगणक हाताळणी वापराबाबतचे D.O.E.C.C किंवा O किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर या पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आंत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल. वरील दोन्ही पदांकरिता शैक्षणिक अर्हता हि किमान अर्हता दर्शवित आहेत तथापी उच्च शैक्षणिक अर्हता व अनुभवाचे उमेदवार प्राप्त झाल्यास त्यांचा अंतिम निवडीसाठी प्राधान्याने विचार करण्यात येईल.

**✦वयोमर्यादा**:-१) वरील दोन्ही पदाकरिता वयोमर्यादा दिनांक २८/०१/२०२० रोजी किमान १८ व कमाल ४३ वर्षापेक्षा अधिक नसावे.

२) शासनाच्या दिनांक २६ ऑगस्ट २००५ च्या शासन निर्णयानुसार सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजने अंतर्गत तीन वर्ष अंशकालीन काम केलेल्या उमेदवारांना उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्ष राहील.

**✦परीक्षा शुल्क**:-वरील दोन्ही पदासाठी **परीक्षा शुल्क रु. १५०/-** इतके राहील. परीक्षा शुल्क रेखांकित डिमांड ड्राफ्ट विशेष लेखापरीक्षक वर्ग-२, सहकारी संस्था अं/विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण) नागपूर विभाग नागपूर या नावाने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. परीक्षा शुल्क कोणत्याही कारणास्तव परत मिळणार नाही.

**✦परिक्षेचे स्वरूप**: लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या असतील. प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास अधिकाधिक ०२ गुण ठेवण्यात येतील. वरील दोन्ही पदांसाठी **पदवी** ही कमीत कमी अर्हता असल्याने सदर पदासाठी परिक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापिठाच्या पदवी परिक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु, मराठी या विषयाच्या प्रश्न पत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या (इयत्ता १२वी) च्या दर्जाच्या समान राहील व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौद्धीक चाचणी या विषयावरील प्रश्नाकरिता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल.

**✦इतर महत्त्वाच्या अटी व शर्ती**:-१) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याच्याकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र/महाराष्ट्रात जन्म झाले बाबतचा जन्म तारखेचा दाखला/शाळा सोडल्याचा दाखला त्यामध्ये जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक राहील. फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परिक्षार्थीसाठी लागु राहतील. इतर परीक्षार्थी/उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

२) उमेदवाराने अर्जात नमुद केलेली माहिती ग्राह्य धरून त्यांना परिक्षेला बसण्याची संधी देण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराने त्यांच्या अर्जामध्ये त्यांच्या पात्रतेनुसार खरी माहिती भरणे आवश्यक आहे. अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा काही त्रुटी राहिल्यास व भरतीच्या टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परिक्षेला बोलवण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

३) उमेदवाराची लेखी परीक्षा ही अर्जात नमुद केलेल्या माहितीच्या आधारे कोणतेही कागदपत्रे तपासणी व छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत.

४) उमेदवारांनी अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार व मिळालेल्या गुणांच्या आधारे कागदपत्रे पडताळणीसाठी बोलावयाच्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करून, मुळ कागदपत्राच्या पुर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास, त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. आवश्यक पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे अधिकार विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (लेखापरिक्षण) नागपूर विभाग नागपूर यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

५) सदरची भरती प्रक्रिया ही मा. सर्वोच्च न्यायालय यांचेकडील निकालास अनुसरून असून शा.नि. दि. २१.१२.२०१९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जात वैधता प्रमाणपत्र (Validity Certificate) अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

६) उमेदवारांनी एकूण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. परिक्षेचा निकाल (निवड सुची) सा.प्र.वि.शा.नि. दिनांक १३.०६.२०१८ मध्ये नमूद निकषांच्या आधारे क्रमवार लावला जाईल. याशिवाय निवड समितीने तयार केलेली निवड सुची एक वर्षासाठी किंवा निवड सुची तयार करतांना ज्या दिनांकापर्यंत रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत. त्या दिनांकापर्यंत , यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य राहील. त्यानंतर ही निवड सुची व्यपगत होईल. सा.प्र.वि.शा.नि. दिनांक १३.०६.२०१८ अन्वये उमेदवाराने उत्तर पत्रिकेवर पेनाचा वापर करणे अपेक्षित आहे तेथे (उदा. बैठक क्रमांक, परिक्षेसंबंधी इतर तपशिलाच्या लिखाणाकरिता, चिन्हाकरिता इ.) केवळ काळ्या शाईच्या बॉल पॉईंट पेनाचा वापर करणे आवश्यक आहे.

७) एखाद्या अर्जदाराने त्याची निवड करण्यासाठी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष राजकिय अथवा अन्य प्रकारे दबाव आणल्यास अथवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल.

८) मा. शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय दिनांक २८.०३.२००५ नुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नुसार विहीत नमुन्यात प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे. (अविवाहित उमेदवारांनी सुद्धा लागू नाही असे नमूद करून सदर प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.)

९) उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्जावर विहीत ठिकाणी अलिकडच्या काळातील एक पासपोर्ट साईज फोटो चिकटवावा व एक पासपोर्ट अर्जासोबत सादर करावा.

१०) अंतिम गुणवत्ता यादीतील निवड झालेल्या उमेदवारांना नागपूर लेखापरीक्षण विभाग अंतर्गत नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा या जिल्ह्यात नेमून दिलेल्या ठिकाणी कोठेही काम करावे लागेल तसेच नियुक्ती दिल्यानंतर विभाग बदली बाबत दावा करता येणार नाही.

११) जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदासाठी अंतिम निवडीसाठी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांना मा. न्यायालयीन निर्णय, मा. शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या अधिन तसेच वैद्यकिय तपासणी/चारीत्र व पुर्वचारीत्रय पडताळणी इत्यादीचे अधिन राहून नियुक्ती दिली जाईल.

१२) वरील पदांकरिता अर्जाचा नमुना वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध केलेल्या कार्यालयाच्या पत्त्यावर ए-४ साईजच्या कागदावर तो परिपुर्णरित्या सुवाच्छ अक्षरात भरून अथवा टंकलेखीत करून डिमांड ड्राफ्टसह सादर करावा तसेच अर्जाचे पाकीटावर ठळक अक्षरात पदाचा उल्लेख करावा. (उदा. उपलेखापरीक्षक/कनिष्ठ लिपीक-टंकलेखक पदासाठी अर्ज) **विहीत मुदतीनंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही. अथवा अपात्र ठरविण्यात येतील याची नोंद घ्यावी.**

१३) सदरच्या पदाकरिता केवळ अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत असल्याने इतर अन्य प्रवर्गातील उमेदवाराचे अर्ज अपात्र ठरविण्यात येतील व त्याबाबत स्वतंत्ररित्या अर्जदारास कळविण्यास येणार नाही.

१४) अर्जाची पात्रता व अपात्रता उमेदवारांना लेखी स्वरूपात कळविली जाणार नाही.

१५) फक्त याच जाहिरातीनुसार ज्या उमेदवाराचे अर्ज विहीत मुदतीत या कार्यालयास प्राप्त होतील अशाच उमेदवाराचे अर्ज विचारात घेतले जातील.

१६) नियुक्त होणाऱ्या उमेदवारास नवीन परिभाषित अंशदायी निवृत्ती योजना लागू राहील. त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणी सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहणार नाही.

१७) उमेदवारांचा अर्जात दिलेल्या पत्रव्यवहाराचा पत्ता, दुरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक बदलल्यामुळे अथवा बंद केल्यामुळे अथवा टपाल विभागाच्या विलंबामुळे परिक्षेची संधी हुकल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१९) सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार अर्ज करणे आवश्यक आहे.

**✦अंतिम निवड सुची व प्रतिक्षासुचीसाठी विचाराधिन ठरविण्यात येणाऱ्या उमेदवारांनी तपासणीवेळी पात्रतेबाबत सादर करावयाची कागदपत्रे:-**

१) वर नमुद पदाकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हतेची गुणपत्रिका/प्रमाणपत्राची मूळ व साक्षांकित प्रत.

२) शैक्षणिक अर्हता, जन्मदाखला/जन्म तारखेबाबत पुरावा, अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate) तसेच जात वैधता प्रमाणपत्र इ. प्रमाणपत्राच्या मुळ व साक्षांकित प्रती.

३) विहीत शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा धारण करणाऱ्या ईच्छुक शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीनेच भरावेत व अशा परवानगीची पत्र मूळ कागदपत्रसह पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

४) उमेदवाराच्या नावांत कोणताही बदल झाला असल्यास, शासन राजपत्राची साक्षांकित प्रत अथवा विवाह नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

५) उमेदवाराने सादर केलेली प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

६) उमेदवाराने लेखी परिक्षेत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे व त्या उमेदवाराची कागदपत्राची पडताळणी अंती ती वैध ठरल्यास अंतिम निवडसुची तयार केली जाईल.

**✦सर्वसाधारण सूचना** १) उपलेखापरीक्षक व कनिष्ठ लिपीक-टंकलेखक संवर्गाच्या परीक्षेचा दिनांक, ठिकाण, वेळ, बैठक क्रमांक इत्यादी तपशिल उमेदवारांना परीक्षा प्रवेश पत्राद्वारे कळविण्यात येईल. त्याकरिता उमेदवारांनी अर्जाच्या नमुन्यासोबत एक स्वतंत्र अद्यावत फोटो जोडणे आवश्यक आहे.

२) प्रवेशपत्राकरिता आधारकार्ड/पॅनकार्ड/वाहन परवाना यापैकी कोणत्याही एका ओळखपत्राची मुळ प्रत उमेदवारांनी सोबत आणणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्राशिवाय उमेदवारास परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही.

३) अर्ज सादर करण्याचा पत्ता:- **विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण) नागपूर विभाग नागपूर प्रशासकीय ईमारत क्र-२, आठवा माळा, वींग-बी, जिल्हा परिषद समोर, सिव्हील लाईन, नागपूर पिन-४४०००१**

**(आर.डी. बिर्ले)**
**विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था**
**(लेखापरीक्षण) नागपूर विभाग नागपूर**

**दिनांक:- २३/०१/२०२०**
**ठिकाण:- नागपूर**